
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# भाई उद्धवराव पाटील : एक असामान्य नेतृत्व (१९२०-१९८४)

विकास रामेश्वर वायकुळे
संशोधक विद्यार्थी, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

## प्रस्तावना



नवीन वर्ष येते आणि निघून देखील जाते, ऋतू येतात-जातात, माणसे जन्मतात-मरतात, परंतु त्यातून असे एखादे असामान्य व्यक्तीमत्त्व आढळून येते, की जे कधीही नष्ट होत नाही. त्यातील आत्मा निघुन गेल्यानंतर देखील ते आपले विचार व कार्य यातून हजारो वर्ष जिवंत राहते असेच एक व्यक्तीमत्त्व म्हणजे भाई उद्धवराव पाटील. ते लोकांन मध्ये 'दादा' या नावाने सुपरिचित होते. त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्यास सुरुवात शालेय जीवनापासूनच केली. पुढे उस्मानिया विद्यापीठात आणखी काही गोष्टी घडल्या. त्यामुळे व्यक्तीमत्त्व अन्यायाविरुद्ध घडतच गेले. पुढे जाऊन दादांनी काही दिवस वकीली केली. पण त्यांचा त्यामध्ये जीव रमेना. दादांनी पुढे राजकारणाची कास धरली. त्यांना ते उत्कृष्टपणे जमले देखील. दादांनी विधानसभा, लोकसभा, राज्यसभा यामध्ये विविध प्रश्न त्वेषाने माडून गाजवले देखील. सरकारला प्रत्येक प्रश्नावर विचार करायला भाग पाडले. दादांचे हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्राम यावरील काम देखील खूप महत्त्वपूर्ण आहे. या सर्वांच्या अनुषंगाने दादांना स्वातंत्र्य सेनानी, लढवय्या नेता, शेतकरी-गोरगरिबांचा तारणहार म्हणतात. दादांविषयी विस्तृत माहिती आज आपण या लेखात पाहू.

## मुख्य शब्द

हैद्राबाद मुक्तीसंग्राम, गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये

१. भाई उद्धवराव पाटीलांचे समग्र (संपूर्ण) कार्य समजून घेणे.

२. भाई उद्धवराव पाटील यांनी तत्कालीन परिस्थितीला कशा प्रकारे तोंड देवून सामान्य नागरिकांना तत्कालीन संकटाच्या जोखडातून मुक्त केले.

## शोधनिबंधाची गृहितके

१. भाई उद्धवराव पाटीलांचे कार्य केवळ हैद्राबाद आणि गोवा मुक्ती संग्रमाबाबतीतच मर्यादित न राहता विविध सामाजिक, आर्थिक, कृषिविषयक, राजकीय, शिक्षण क्षेत्रात मैलाचा दगड ठरलेले दिसून येते.

२. भाई उद्धवराव पाटलांच्या कार्यामुळे सामान्य नागरिकांचे सक्षमीकरण होताना दिसून आले आहे.

## वर्णनात्मक संशोधन पद्धती

भाई उद्धवराव पाटील यांचा जन्म ३० जानेवारी, १९२० रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यात माणकेश्वर या गावी (आजोळी) झाला. त्यांचे मूळ गाव बार्शी तालुक्यातील 'इर्ले' हे आहे. त्यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण मुळ गाव असलेल्या इर्ले गावातच पूर्ण केले. पुढील शिक्षण उस्मानाबाद येथे घेतले. तर पुढे एल. एल. बी. साठी पुढे हैद्राबाद उस्मानिया विद्यापीठात प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी काही काळ वकीलीचा व्यवसाय देखील केला.

भाई उद्धवराव पाटील यांच्यावर त्यांचे छोटे चुलते ज्ञानेश्वर तात्या व त्यांच्या भगिनींचे यजमान ॲड. नरसिंगराव देशमुख यांच्यामुळे लहान वयातच सत्यशोधकी आणि मार्क्सवादी विचारांचे संस्कार रुजले गेले. त्यामुळे फारकाळ वकीलीत न रमता त्यांनी सामाजिक कार्याची व राजकारणाची वाट धरली. सन १९३५ पासूनच खरे तर त्यांनी विद्यार्थी संघटनेमध्ये सहभागी होऊन आपल्या कार्याला सुरूवात केलेली होती. भाई उद्धरावदादा यांचा प्रामुख्याने हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी कार्यात हिरीरीने सहभाग असायचा. तसेच त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची शाखा मराठवाड्यात उघडली आणि त्याचा प्रसारही केलेला दिसून येतो.

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी 'इर्ले' या त्यांच्या मूळ गावी त्यांनी ग्रामपंचायतीवर झेंडा फडकवला. हे काम सोपे नव्हते. कारण या गावात निजाम राजवटीचे बराच काळ प्राबल्य होते. त्यात दादांनी हे मोठे धाडस केले होते.

भाई उद्धवराव दादांनी क्रांतिसिंह नाना पाटील, ॲड. नरसिंगराव देशमुख, ज्ञानेश्वर तात्यांकडून प्रेरणा घेऊन तसेच बापूसाहेब लाड यांच्याबरोबर भूमिगत राहून मराठवाड्यात थैमान घालणाऱ्या 'रझाकरां' विरुद्ध काही भिल्लांच्या समवेत सशस्त्र लढा उभा केला आणि रझाकारांस मराठवाड्यातून पळता भूई थोडी करून त्यांना पळ काढण्यास भाग पाडले.

भाई उद्धवराव दादांनी स्वजाती विरुद्ध तसेच भांडवलशाही सारंजामशाही, सावकारी व्यवस्था याविरुद्ध त्यांनी कायम लढा देवून सर्वसामान्य, कष्टकरी वर्गाचे प्रश्न उपस्थित केले आणि त्यावर उपाय देखील सुचविले. दादांनी हातगावच्या मराठा जमीनदार असणाऱ्या रामराव सरवदकर यांच्या विरुद्ध त्यांनी पहिला लढा दिला. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात सावकारी करणाऱ्या मुलचंद गांधी यांना लातूरच्या परिषदेमध्ये शेतकऱ्यांच्या मोर्चामध्ये नेऊन शेतकऱ्यांच्या खरेदीखत करून घेतलेल्या जमीनी पुन्हा शेतकऱ्यांना देण्यास भाग पाडले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वत:च्या वडिलांना पाटिलकीचा राजीनामा द्यावयास लावला. दादा सतत शेतकरी व पिडीतांच्या मागे उभे राहीले. ते सतत म्हणायचे 'भक्षक हा रक्षक होऊ शकत नाही', 'कसेल त्याची जमीन', 'सावकारशाही ठेवायची नाही ! ठेचायची हाय' आदि दादांच्या घोषणा प्रसिद्ध होत्या. दादांनी सामान्य जनतेला संघटित करून शेतकऱ्यांचे उत्तम प्रकारे संघटन केले व त्यांनी त्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडविले.

बार्शी शहराच्या आसपास दादांनी सशस्त्र कॅम्प उभे केले व रझाकारांपासून हा भाग मुक्त केला आणि प्रतिसरकारचीच स्थापना केली. 'तुफानोंसे टकराता है उसे इन्सान कहते है' असे उद्धवराव दादा नेहमी म्हणत असत. दादांनी भूमिगत आणि पक्षीय भूमिका घेत-घेत जमीनदारी-सावकारी, सरकारची लेव्ही काढण्याची पद्धती, कॉंग्रेसमधील उच्च जातीय यांचे वर्चस्व यांच्या विरोधात कायम लढा दिला. दादांनी शेतकरी कामगार पक्षाच्या ऱ्हासाच्या काळात पक्षाला आधार देऊन तो टिकविण्यामध्ये मोठा वाटा होता. दादा नेहमी म्हणत असत 'आमचा जन्म सत्तेसाठी नाहीच, तर आम्ही जन्मलो केवळ संघर्षासाठी' ही खुनगाठच त्यांनी मनाला बांधली होती. दादा जनसामान्याचे प्रश्न घेऊन त्यांचे संघटन करणे व लढा देणे याबरोबरच लोकशाहीचे दालन असलेल्या विधानसभा, लोकसभा, राज्यसभा आदी सभागृहांचे प्रतिनिधित्व करून त्यात शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे, दीन-दुबळ्यांचे प्रश्न उपस्थित करण्याचे काम त्यांनी केले.

दादा सन १९५७ ते १९६२ व १९६७ ते १९७२ या काळात विधानसभा सदस्य होते. तर सन १९६४ ते १९६६ या काळात ते राज्यसभेवर होते आणि पुढे सन १९७७ मध्ये ते लोकसभा सदस्य म्हणून निवडून आले. यावेळी त्यांनी अतिशय महत्त्वाचे असे लोकसभा विरोधी पक्षनेता म्हणून काम पाहिले असे म्हणावे लागेल कारण त्यावेळी १९७९ ते १९८९ विरोधी पक्षनेता पद रिक्तच होते. त्यांनी जमीन सुधारणा, जमीनीचे पुणर्वाटप, कमाल जमीन धारण कायदा, कुळकायदा, शेतीमालास योग्य भाव, शेतीमालास स्वतंत्र बाजारपेठ, कमी व्याजदरात शेतकऱ्यांना कर्ज, साखर कारखाने शेतकऱ्यांच्या ताब्यात द्यावेत, विकासातील समतोल साधने, रोजगार हमी योजना, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, दलितांना शिष्यवृत्ती व नोकरीत आरक्षण आणि प्रतिनिधी गृहात देखील भागीदारी द्यावी आदी मागण्या दादांनी लोकसभा, राज्यसभा व विधानसभा या सभागृहांमध्ये हिरारीने मांडल्या.

सीमा प्रश्नावरील त्यांची आंदोलने, भूमीगत कार्य आणि विधानभवनावर त्यांनी नेलेले शेतकऱ्यांचे मोर्चे, तसेच विशेषत: विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीस विरोध ही दादांची सामाजिक कारकीर्द महत्त्वपूर्ण राहीली. दादांनी राजकीय, सामाजिक क्षेत्राबरोबरच प्रशासकीय स्वरूपाची कार्येही त्यांनी केली. सन १९६८ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकलेखा समितीचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. तसेच सन १९७२ मध्ये महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीचे सदस्य व सन १९७३ मध्ये राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक म्हणून त्यांनी कार्य केले.

'आमचा जन्म सत्तेसाठी नाहीच तर आम्ही जन्मलो केवळ संघर्षासाठी' अशी गाठ उराशी बांधून सतत लढत राहणाऱ्या भाई उद्धवराव पाटलांना समतेचा यात्रेकरू, वारकऱ्यांचा निष्ठावान, अखंड लढणारा योद्धा आणि कष्टकऱ्यांचा कैवारी अशा अनेक उपमा लागल्या होत्या.

अशा महान स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, समाजसुधारक असलेल्या भाई उद्धवराव पाटीलांचे १२ जुलै, १९८४ रोजी निधन झाले.

## सारांश

भाई उद्धवराव पाटील यांच्या कार्याच्या सीमा अमर्याद होत्या हे या लेखाद्वारे लक्षात येते. मग ते समाजकारण असो, राजकारण असो, शेतकरी-दीन-दुबळे यांचे प्रश्न असो, की शिक्षण, अर्थव्यवस्था यासारख्या महत्त्वाच्या बाबी असोत दादा नेहमी अग्रेसर असत. दादांनी हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्रामात दाखविलेले धाडस देखील खूप महत्त्वाचे आहे. दादांनी विधानसभा, लोकसभा नेहमीच गाजवल्या. विरोधी पक्ष नेते असताना तर सरकारला सभागृहात घाम फोडला. विधिमंडळ नियम समितीवर देखील त्यांनी काम केले. राहुरी सारखी कृषी विद्यापिठे स्थापन होण्यास देखील दादांचे योगदान होते. हैद्राबाद स्टेट असेम्लीत देखील दादांनी कार्य केले होते. अशा प्रकारे प्रत्येक क्षेत्रात, जिथे गरज आहे तिथे दादांनी आपले योगदान दिलेले दिसून येते.

## संदर्भ सुची

१.युनिक महाराष्ट्र वार्षिकी
२.महाराष्ट्राचे शिल्पकार : भाई उद्धवराव पाटील, लेखक : व. न. इंगळे